रे.मु.क्र. ४३/२०१८
संतोष पाटील व इ.
वि.
मच्छिंद्रनाथ पाटील

**नि.क्र.१२ वरील आदेश**
(ता.०६.०७.२०२२)

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रीया संहिताचे ऑर्डर २६ रूल ९ खाली केला आहे. प्रतिवादींनी **नि.१५** खाली त्यांचे म्हणणे दाखल करून सदर अर्जास जोरदार हरकत घेतली आहे.

२. वादींचे कथन की, दावा मिळकत त्यांच्या मालकीची असून प्रतिवादींनी त्यामध्ये अतिक्रमण केले असून सदरचा दावा अतिक्रमण दुर करून ताबा मिळण्याकरीता दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा अतिक्रमणाचा असल्याने वादाचे योग्य प्रकारे निराकरण करण्यासाठी व प्रत्य क्ष वस्तुस्थिती समोर येण्यासाठी दावा मिळकतीची मोजणी करून त्याचा अहवाल नकाशासह मिळणेकरीता आदेश होण्यासाठी सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

३. प्रतिवादींनी त्यांचे म्हण्णणे दाखल करून अर्जास तिव्र आक्षेप घ ेतला आहे. प्रतिवादींचे कथन की, वादींनी सदर अर्ज दाव्यातील त्रुटी आणि उणिवा भरून काढण्यासाठी केला असून सदरच्या अर्जाद्वारे वादी त्याच्या बाजूने पुरावा गोळा करू पाहत आहे. तसेच वादींनी यापूर्वीही सन २००८ साली मोजणी केली असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण दिसून येत नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी मागणी प्रतिवादींनी केली.

४. अर्ज आणि म्हणणे याचे अवलोकन केले असता, तालुका भुमी अभिलेख पेण यांच्यामार्फत वादींनी सन २००८ साली मोजणी केल्याचे अभिलेखावरील उपस्थित मोजणी अहवालावरून स्पष्ट दिसते. परंतु

दाव्यामध्ये प्रतिवादींनी सन २०१७ मध्ये दावा मिळकतीत बांधकाम करून अतिक्रमण केल्याचे वादींचे कथन आहे. त्यामुळे आधीच्या मोजणीनंतर जर वादींच्या कथनाप्रमाणे अतिक्रमण झाले असल्यास या दाव्यातील वाद मुद्दयाचे निराकरण करणेकामी मोजणी होवून अतिक्रमीत क्षेत्र दाखवून त्याप्रमाणे हद्दी निश्चित करून तसा अहवाल आणि नकाशा दाखल करणेचा आदेश करणे न्यायाच्या दृष्टीने उचित ठरेल. करीता पुढील आदेश परित करण्यात येतो.

## आदेश

१. वादीचा **नि.क्र.१२** वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. न्यायालयीन आयुक्त म्हणून तालुका निरीक्षक भूमी अभिलेख पेण, यांची नियुक्ती करण्यात येत आहे. त्यांनी मौजे बळवली येथील सर्व्हे नं.१५, हिस्सा नं.१० अ क्षेत्र हेक्टर आर ०—४—० याची मोजणी करून हद्दी कायम करून, नकाशा तयार करून अतिक्रमीत क्षेत्र असल्यास तो दर्शवून त्याप्रमाणे सविस्तर दिसते परिस्थितीचा अहवाल तयार करून तो जाबजबाबासह लवकरात लवकर सादर करावा.

३. वादींनी न्यायालयीन आयुक्त यांची मोजणी फी तालुका निरिक्षक भुमी अभिलेख, पेण यांच्याकडे भरावी.

४. वरीलप्रमाणे न्यायालयीन आयोग पत्र जारी करावे.

Digitally signed by RUBEENA NAJIR MUJAWAR
Date: 2022.07.07 16:49:59 +0530

पेण (श्रीमती आर.एन.मुजावर)
दिनांक : ०६/०७/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेण.

CERTIFICATE

"I affirm that the contents of this PDF file order are same word for word as per original order".

| | |
|---|---|
| Name of the stenographer | : Shri. A. A. Nakhawa |
| Name of the Court | : Smt. R. N. Mujawar |
| | Civil Judge, J.D.and J.M.F.C. Pen |
| Date of Decision | : 06-07-2022 |
| Order signed by presiding officer | : 07-07-2022 |
| Date of PDF | : 07-07-2022 |
| Order uploaded on | : 07-07-2022 |